# एईएमएलकडून डिजिटल प्लॅटफॉर्म्सचे संवर्धन




**प्रतिनिधी**/मुंबई

कोविड-१९ साथीने जगाला अधिक घट्ट जोडले आहे आणि ग्राहकांच्या सर्व वर्गांमध्ये डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा वापर खूपच वाढला आहे. अधिकाधिक ग्राहक तंत्रज्ञानाशी जुळवून घेऊ लागले असताना, युटिलिटीजसाठी संधीही अनंत आहेत. शंकांचे निरसन व्हर्च्युअल पद्धतीने करून घेण्यातील सोय आणि यूजर फ्रेण्डली इंटरफेसेसची जोड मिळालेले वन-क्लिक पेमेंट्स यांमुळे प्रत्यक्ष भेट देणे किंवा पैसे भरण्याच्या अन्य मार्गांना अत्यंत आकर्षक पर्याय उपलब्ध झाला आहे.

एईएमएल ग्राहक आता सेल्फ मीटर रीडिंग, ईमेल व एसएमएसद्वारे बिले प्राप्त करणे, एईएमएलच्या वेबसाइटवर किंवा ॲपवर बिले बघणे यांसारख्या अनेकविध सेवा डिजिटल पर्यायांचा वापर करून उपलब्ध करून घेऊ लागले आहेत. ग्राहक त्यांची बिले ऑनलाइन मार्गांनी चुकती करू शकतात, नवीन जोडणीसाठी अर्ज करू शकतात, बिलावरील नावे बदलून घेण्यासारख्या प्रक्रिया ऑनलाइन करू शकतात तसेच अशा अनेक सेवांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा वापर करू शकतात.

ग्राहकांना डिजिटल प्लॅटफॉर्म्स वापरण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एईएमएलने आपल्या वेबसाइट तसेच ॲपवर डिजिटल फीचर्सचा ताफा आणला आहे. ग्राहकांना एका क्लिकद्वारे तसेच आपापल्या घरांत बसून आरामात व्हर्च्युअल पद्धतीने या सेवांचा लाभ घेता यावा हे निश्चित करण्यासाठी हे फीचर्स विकसित केले आहेत.